**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६ ००४**

क्र.कोविमं/माध्य. परीक्षा/2138
कोल्हापूर - ४१६ ००४.
दिनांक :- १३/११/२०१८

प्रति,
सर्व मुख्याध्यापक,
मंडळ मान्यताप्राप्त शाळा, सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय :** फेब्रुवारी-मार्च २०१९ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नाव नोंदणी (enrolment certificate) प्रमाणपत्राबाबत व सदर विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करण्याच्या तारखाबाबत .

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१९ मध्ये घेण्यात येणा-या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इ. (१०वी) परीक्षेसाठी खाजगीरित्या (private Candidate) नियमित शुल्कासह ऑनलाईन अर्ज दिनांक ०३/१०/२०१८ पर्यंत सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने जे विद्यार्थी नाव नोदणी प्रमाणपत्रा मिळण्यास पात्र ठरलेले आहेत अशा विद्यार्थ्यांना त्यांची नाव नोंदणी प्रमाणपत्रे ( Enrolment Certificate) दिनांक १३/११/२०१८ पासून विद्यार्थ्यांना त्यांच्या भ्रमणध्वनीवर व ईमेलवर संदेश (SMS) उपलब्ध होतील. अशा विद्यार्थ्यांनी आपले स्वत:चे नावनोंदणी प्रमाणपत्र **http://form 17.mh-ssc.ac.in** या संकेत स्थळावरुन दिनांक १३/११/२०१८ पासून उपलब्ध करुन घ्यावीत.

तसेच सदर नाव नोंदणी प्रमाणपत्र झालेले खाजगी विद्यार्थ्यांची मार्च २०१९ मध्ये घेण्यात येणा-या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पद्धतीने **www.mahasscboard, maharashtra.gov.in** किंवा **www.mahasscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| शुल्क प्रकार | खाजगी विद्यार्थ्यांची ऑनलाईन पद्धतीने परीक्षेची आवेदनपत्रे माध्यमिक शाळांमार्फत भरावयाच्या तारखा | खाजगी विद्यार्थी परीक्षा आवेदनपत्रांचे शुल्क माध्यमिक शाळांनी बँकेत चलनाद्वारे भरावयाच्या तारखा |
|---|---|---|
| नियमित शुल्कासह | मंगळवार दिनांक १३/११/२०१८ ते शुक्रवार दिनांक २३/११/२०१८ | सोमवार दिनांक २६/११/२०१८ ते शनिवार दिनांक ०१/१२/२०१८ |
| विलंब शुल्कासह | शनिवार दिनांक २४/११/२०१८ ते बुधवार दिनांक २८/११/२०१८ | |

अ) वितरण केंद्रप्रमुख /संपर्क केंद्रप्रमुखानी विभागीय मंडळाकडे शुल्क भरण्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख -- बुधवार दिनांक ५/१२/२०१८

ब) दिनांक २६/११/२०१८ ते ०१/१२/२०१८ या कालावधीत माध्यमिक शाळांनी विद्यार्थ्यांच्या याद्या excel मध्ये प्रिंटींग करणे.

१) परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळेमार्फत भरावी.

२) सर्व विभागीय मंडळातील माध्यमिक शाळांनी प्रचलित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

३) खाजगी विद्यार्थ्यांचे नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे साद केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.**